# घटनास्थळ पंचनामा

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# घटनास्थळ म्हणजे काय? व त्याचे तपासाचे दृष्टीने महत्व

- गुन्हा घडले नंतर गुन्हयाच्या प्रथम खबरीच्या माध्यमातुन पोलीसांच्या निर्दशनास आणुन दिलेले किंवा आलेले असे गुन्हा घडलेले ठिकाण जेथे गुन्हयासंबधीचे पुरावे, भौतिक दुवे, मिळतात त्या ठिकाणाला गुन्हयाचे घटनास्थळ असे म्हणता येईल.
- घटना जेथे घडली असल्याची खबर मिळाली ते ठिकाण म्हणजे प्राथमिक घटनास्थळ
- घटनास्थळावर जखमी, पिडीत, मयत, संशयीत/ आरोपी, वाहन, हत्यारे, इत्यांदींची माहीती मिळण्याची दाट शक्यता असते.
- काही गुन्हयामध्ये घटनास्थळ हे एका पेक्षा जास्त ठिकाणीही असण्याची शक्यता असते.
- गुन्हयाच्या घटनास्थळाची नव्याने निर्मीती सुध्दा केली जाउ शकते (उदा आरूषी तलवार हत्याकांड)
- घटनास्थळ हे गुन्हयाचे तपासाचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे असुन घटनास्थळाचे निरीक्षणावरूनच गुन्हयाचे तपासाचा निष्कर्ष लावला जावु शकतो.

# घटनास्थळ म्हणजे काय? व त्याचे तपासाचे दृष्टीने महत्व

- घटनास्थळाचे निरीक्षणावरून फिर्यादीने तक्रारीत नमुद केलेली परिस्थीती व घटनास्थळी असलेली परिस्थीती एक सारखी असल्यास ती पुष्टीकारक ठरते. घटनेची सत्यता पडताळणे व ती न्यायालयात सिध्द करणे शक्य होत.
- गुन्हा घडतेवेळी घटनास्थळाची स्थिती काय होती. तसेच त्या ठिकाणी भरपुर सुर्य प्रकाश होता किंवा कसे? साक्षीदाराला घटना पाहणे शक्य होते अगर कसे हे ठामपणे घटनास्थळ बघुन मांडता येते.
- गुन्हयाचे स्वरूपानुसार गुन्हा करतांना आरोपी काही भौतिक दुवे अथवा जैविक दुवे सोडुन गेले असल्यास त्याचा उपयोग आरोपीविरूध्द पुरावा म्हणुन न्यायालयात सादर करणे शक्य होते.
- गुन्हा करण्याचे पध्दतीवरून सराईत गुन्हेगार शोधणे शक्य होते.

## घटनास्थळ म्हणजे काय? व त्याचे तपासाचे दृष्टीने महत्व

- तपासाची कायदेशिर प्रक्रिया घटनास्थळपासुनच सुरु होते.
- अनेक वेळा घटनास्थळाचे ठिकाणीच तपासाचे यश किंवा अपयश हे अवलंबुन असते. घटनास्थळाची कशा प्रकारे हाताळणी केली यावरच अवलंबुन आहे.
- तपासी अधिकारी / अंमलदार यांना घटनास्थळ निरीक्षण करण्याचे ज्ञान आणि कौशल्य असणे आवश्यक आहे. त्यांनी ते आत्मसात करुन घेणे गरजेचे आहे.
- घटनास्थळाचे ठिकाणी, परीसारत असलेले विविध पुरव्याच्या वस्तु, भौतिक दुवे, ओळखता येणे गरजेचे आहे.

# घटनास्थळाचे प्रकार

- शरीराविरूध्द घडलेल्या (खुन, जिवे मारण्याचा प्रयत्न, गंभीर / साधी दुखापत, ) गुन्हयाचे घटनास्थळ
- माला विरूध्द घडलेल्या ( चोरी, जबरी चोरी, दरोडा) गुन्हयाचे घटनास्थळ
- लैगिंक अत्याचारा संबधीच्या (बलात्कार, छेडछाड) गुन्हयाचे घटनास्थळ
- अकस्मात मृत्युचे घटनास्थळ
- जळीत प्रकरणातील घटनास्थळ
- मोटार अपघाताचे घटनास्थळ
- बंदीस्त / उघडया जागेवरील घटनास्थळ
- आर्थीक अफरा तफरीच्या गुन्हयातील घटनास्थळ
- एका पेक्षा जास्त प्रकारचे अपराध (दरोडा, खुन, गंभीर दुखापत, दंगल, मालमत्तेचे नुकसान, बलात्कार इ.) घडलेल्या गुन्हयांचे घटनास्थळ

# घटनास्थळ पंचनाम्यासंबधीच्या कायदेशिर तरतुदी

- फौ.दं.प्र.सं कलम १५४ प्रमाणे दखलपात्र अपराधाची खबर प्राप्त झाले नंतर फौ.दं.प्र.स कलम १५६ प्रमाणे पोलीसांना गुन्हयाचे घटनास्थळावर जावुन तपासाचे अमर्याद अधिकार प्राप्त होतात. अशा दखलपात्र अपराधाच्या तपासाची प्रक्रीया फौ.दं.प्र.स कलम १५७ प्रमाणे सुरू होवुन १५७(१) प्रमाणे दखलपात्र अपराधाच्या गुन्हयाचा घटनास्थळ पंचनामा करण्याची तरतुद आहे.
- फौ.दं.प्र.सं. कलम १७४ प्रमाणे अकस्मात मृत्युची खबर प्राप्त झाले नंतर फौ.दं.प्र.स कलम १७५ प्रमाणे पोलीसांना अ.मृच्या तापासाचे अधिकार प्राप्त होतात. अशा अकस्मात मृत्युच्या घटनास्थळाचा पंचनमा फौ.दं.प्र.स कलम १५७(१) प्रमाणे करण्याची तरतुद आहे.

# घटनास्थळ पंचनाम्यापुर्वीची पुर्व तयारी

- अपराधाची खबर मिळाल्यानंतर तात्काळ अपराधाचे घटनास्थळ सुरक्षित करणे करीता अंमलदरांची नियुक्ती करून त्यांना घटनास्थळी रवाना करावे. तशी स्टेशनडायरीला नोंद घ्यावी. बरेच वेळा अपराध घडलेनंतर बघ्यांची गर्दी, वरीष्ठ अधिकारी, राजकीय नेते यांच्या भेटी घटनास्थळावर होतात. त्यामुळे पुरावे नष्ट होण्याची अथवा त्यामध्ये बदल होण्याची दाट शक्यता निर्माण होवुन त्याचा तपासावर परीणाम होवु शकतो.
- दाखल अपराधाबाबत वरीष्ठांना तात्काळ माहीती कळवावी.
- पंचनाम्याकरीता पेपर, पेन, मिटर पट्टी, कॅमेरा, सिलींग, पॅकींग व लेबलिंगचे साहीत्य बरोबर घ्यावे. कॅमेरा नसेल तर फोटोग्राफरला सोबत घ्यावे.
- गुन्हयाचे स्वरूपानुसार अंगुलीमुद्रा तज्ञ, रासायनिक विश्लेषक, वैद्यकीय अधिकारी व डॉगस्कॉड यांना घटनास्थळावर बोलावुन घेणे, केलेल्या सर्व कार्यवहीच्या नोंदी स्टेशन डायरी मध्ये घ्याव्या

# घटनास्थळ पंचनाम्या करीता पंचाची निवड कशी करावी

- पंच हुशार, सभ्य व बोलका आणि शक्यतो सुशिक्षीत असावा.
- पंच निपक्षपाती असावा. पोलीस अथवा संबंधीत व्यक्तिचा तो मिंदा नसावा.
- दाखलेबाज अथवा पोलीस प्रकरणात तो गुरफटलेला नसावा.
- दोन पक्षकरांच्या घटनेत पंचनामा करावयाचा असल्यास पंच कुठल्याही एका पक्षकाराच्या अमिशाला बळी पडणारा नसावा.
- धर्माने, शारीरिक पिडीने, अगर व्यंगाने आक्षेपार वाटेल असा इसम पंच अथवा पिडीत / संशयीत  व्यक्तिचा दोस्त अगर शत्रु यापैकी नसावा.
- गुन्ह्याशी अथवा संघटनेशी संबंध नसणारा इसम पंच असावा.
- पंच म्हणून पुढे येण्यास नाराजी दाखविणारा इसम पंच म्हणून कधीच निवडू नये.
- पंच दोन किंवा पाच यासंख्येपर्यंन्त असावेत.

- पंचनामा ज्या परिसरात केला त्याच परिसरातील इसम शक्यतो पंच म्हणून निवडावा.
- एक इसम इतरत्र दोन वेळा पंच म्हणून पोलीसांनी वापरला असेल, तर त्याला तिसऱ्यांदा पंच म्हणून निवडू नये. ही बाब खटल्याच्या वेळी पोलीसांना घातक ठरण्याचा संभव असतो. धंदेवाईक पंच म्हणून बचाव पक्ष कोर्टात तो मुद्दा सिद्ध करतो.

# घटनास्थळ निरीक्षणाच्या पध्दती

- Strip Method :- पट्टा पध्दत घटनास्थळाची १-१ मिटर मध्ये विभागणी करून त्याचे बारकाईने निरीक्षण करणे (  )
- Spiral Method :- एका बाजुने जावुन गोलाकार पध्दतीने घटनास्थळाचे निरीक्षण करणे (  )
- Zone Method :- घटनास्थळाची चौकोणात विभागणी करून निरीक्षण करणे(  )
- Wheel Method :- घटनास्थळाची गोलाकार विभागणी करून निरीक्षक करणे 
- Clockwise or Anticlocwise Method :- घटनास्थळाचे घडयाळाच्या काटेच्या दिशेने किंवा विरूध्द दिशेने निरीक्षण करणे, सदर पध्दत हि जास्त प्रमाणात प्रचलित असुन घटनास्थळ निरीक्षणासाठी नियमतीत पणे वापरली जाते. परंतु घटनास्थळाच्या भौगलिक परीस्थीतीनुसार वरील पध्दतींचा वापर करावा.

# घटनास्थळावर तपासी अधिकारी / अंमलदार यांची भुमिका

- घटनास्थळावरील जखमी व्यक्तींना प्रथम औषोधोपचारासाठी दवाखान्यात पाठविणे, यात जखमी, पिडीत, आरोपी किंवा साक्षीदार असु शकतात
- घटनास्थळाचे सभोवती आवश्यकते प्रमाणे बॅरीकेटींग, पट्टी,दोरी लावुन संरक्षण करणे
- घटनेची माहीती असणारा साक्षीदार, पिडीत व पंचासमक्ष घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करणे, निरीक्षणादरम्यान मिळुन येणारे पुरावे किंवा पुराव्याच्या दृष्टीने महत्वाचे वाटणारे साहीत्य / भौतिक पुरावे / जैविक पुरावे हे तज्ञांच्या मदतीने गोळा कारावे, त्यांचे सिलींग पॅकींग व लेबलिंग करून न्यायसहायक प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठवावे. त्याच बरोबर त्यांचे फोटोग्राफरच्या मदतीने फोटो काढुन घ्यावे.

# घटनास्थळावर तपासी अधिकारी / अंमलदार यांची भुमिका

- अंगुलीमुद्रा तज्ञ यांचे मदतीने घटनास्थळावर मिळुन येणारे हाताचे, पायांचे, बोटांचे ठसे ओळखुन ते संकलीत करावे. त्याचे फोटोग्राफ घेवुन अंगुलीमुद्रा तज्ञ यांचे कडेस तपासणीसाठी पाठवावे.
- घटनास्थळावर संशयीत गुन्हेगाराचा येण्याचा मार्ग, बाहेर जाण्याचा मार्ग याची डॉगस्कॉड कडुन तपासणी करून घ्यावी.
- घटनास्थळ निरीक्षणा दरम्यान घटनास्थळाचे विविध कोनातुन फोटोग्राफ घ्यावे. त्याच बरोबर शक्य असल्यास व्हिडीओ चित्रिकरण करावे.

# घटनास्थळ पंचनामा करतांना विचारात घ्यावयाचे मुद्दे

- शक्यतो घटनास्थळ पंचनाम्याकरीता एनसीबी ने निर्धारीत केलेल्या फार्मचा वापर करावा
- फार्म मधील सर्व कॉलम काळजीपुर्वक भरावे (उदा. राज्य, जिल्हा, पोलीस ठाणे, दिनांक, गु.र.नं. व कलम / स्टेशन डायरी नोंद क्र. / मोटार अपघात रजी नं / अमृ रजी नं / दवाखाना नोंद क्र, घटनास्थळ दाखविणा-याचे नांव व पत्ता, पंचाची नांवे इत्यादी व इतर )
- पंचनामा पंचाचे सांगणे व पहाणे या प्रमाणे करावा.
- पंचनाम्याच्या सुरवातीला गुन्हयाची थोडक्यात हकीकत नमुद करून घटनास्थळ दाखविणारे साक्षीदार / फिर्यादी / पिडीत या पैकी ज्यांनी दाखविले त्यांचे नांव नमुद करावे.

# घटनास्थळ पंचनामा करतांना विचारात घ्यावयाचे मुद्दे

- घटनास्थळाचे निरीक्षण करणे करीता अवलंबविलेल्या पध्दतीचा उल्लेख करावा.
- घटनास्थळाचे सविस्तर वर्णन घ्यावे. आवश्यक त्या ठिकाणी मिटरपट्टीने मोजमाप करून अंतर दिशा यांचा उल्लेख करावा.पंचनाम्यामध्ये अंतर / दिशा किंवा इतर मोजमापाबाबत अंदाजे / सुमारे या शब्दांचा वापर करु नये त्याचा आरोपी पक्षाला फायदा होण्याची दाट शक्यता असते.
- पुराव्याच्या दृष्टीने जप्त केलेल्या सर्व वस्तुंचा सविस्तर उल्लेख पंचानाम्यात करावा. तसेच घटनेशी संबधीत वस्तु / हत्यार / इतर भौतिक /जैविक पुरावे ज्या तज्ञांच्या मदतीने जमा केले त्यांचे नावाचा व सिलींग पॅकींग करून तपासणीसाठी पाठविले तर त्याचाही उल्लेख करावा
- पुरावे घटनास्थळ दाखविणा-याने ओळखले असतील तर तसाही उल्लेख करावा.

# घटनास्थळ पंचनामा करतांना विचारात घ्यावयाचे मुद्दे

- पंचनामा कशाचे प्रकाशात केला याचा उल्लेख करावा.
- घटनास्थळाचे स्थान निश्चित करणेसाठी लगतच्या चर्तुरसिमांचा उल्लेख करावा (पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर दिशेस असलेल्या ठिकाणांचा, उल्लेख करावा.)
- घटनास्थळाचे रेखांश व अक्षांस पंचनाम्यात नमुद करावे.
- पंचनाम्यामध्ये घटनास्थळाचे निरीक्षणास सुरवात केलेली वेळ ते संपुर्ण पंचनामा लिहुन संपल्यानंतरची वेळ पंचनाम्यात नमुद करावी.
- पंचनाम्यावर पंचाच्या व तपासी अंमलदारच्या सहया घ्याव्या
- आरोपी हजर असले तर आरोपीची सही घ्यावी.
- गुन्हयाच्या स्वरूपानुसार घटनास्थळाचा नकाशा बांधकाम विभागाचे तज्ञांकडुन काढुन घ्यावा. त्याबाबत त्यांचा जबाब नोंदवावा तसेच नकाशावर पंचाच्या सहया घ्याव्यात

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....